महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

रविवार ■ २२ फेब्रुवारी २०२६ ■ वर्ष - सातवे ■ अंक : २३७ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

## अजित पवार विमान अपघात प्रकरणी रोहित पवारांची नागरी उड्डाण मंत्र्याच्या राजीनाम्याची मागणी

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २१**

मुंबई : उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे अपघाती निधनानंतर त्यांच्या विमानातील अपघाताबाबत अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. अजित पवारांचे पुतणे आणि आमदार रोहित पवार यांनी सातत्याने या प्रकरणी मुद्दे उपस्थित करत काही पुरावे सादर करण्याचा प्रयत्न केला आहे.

मुंबईत पत्रकार परिषद घेऊन रोहित पवारांनी नंतर दिल्लीतील शरद पवारांच्या निवासस्थानी पत्रकार परिषदेत थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्याकडे सखोल चौकशीची मागणी केली. यावेळी त्यांनी नागरी उड्डाण मंत्री राममोहन नायडू यांच्या राजीनाम्याचीही मागणी केली.

मुंबईतील पत्रकार परिषदेत रोहित पवारांनी ब्लॅक बॉक्स आणि इतर तांत्रिक त्रुटी मीडिया समोर मांडल्या. त्यांनी डीजीसीएतील अनेक अधिकाऱ्यांच्या तपासावरही आक्षेप घेतला आणि व्हिसीएआर कंपनीवर बंदी घालण्याची मागणी केली. तसेच, केंद्रातील मोठ्या नेत्यांचा व्हिसीएआर कंपनीच्या मालकाला साथ असल्याचा आरोप केला. रोहित पवार म्हणाले, "नागरी उड्डाण मंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी मी या पत्रकार परिषदेतून करणार आहे. या प्रकरणात मी पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना विनंती करणार आहे. या तपासात न्याय देण्यासाठी देशातील प्रभावशाली लोकांनी लक्ष घालावे, कारण तेच प्रकरणातील न्याय देऊ शकतात."

व्हिसीएआरला कोणी वाचवत असेल तर तोही एक षडयंत्राचा भाग असू शकतो. डीजीसीएचे मोठे अधिकारी यामागे आहे, तर मला वाटतं की अजित पवारांना न्याय द्यायचा असेल तर महाराष्ट्र आणि देशातील लोक प्रयत्न करत आहेत, पण या तपासात न्याय देण्याची गरज असेल तर या देशातील प्रभावशाली लोकांनी यात लक्ष घातलं पाहिजे. कारण, तेच याप्रकरणी न्याय देऊ शकतात. कारण, या प्रकरणातील लोकही प्रभावशाली आहेत. भारताचे सर्वांत मोठे प्रभावशाली लोक नरेंद्र मोदी आणि अमित शाह हेच त्यांना न्याय देऊ शकतील. त्यांनी या प्रकरणी जातीने लक्ष घालावं. मी नरेंद्र मोदींना याविषयी इमेलद्वारे पत्र लिहिणार आहे, असं रोहित पवार म्हणाले.


Rohit Rajendra Pawar
Member, Maharashtra Legislative Assembly

O/W No. RRP/DEL/2026/21-02-01
DATE : 21-02-2026

Respected Sir,

I am writing to you to request immediate action regarding the Union Civil Aviation Minister, Shri Ram Mohan Naidu. Serious questions have arisen about the company VSR and its links with Shri Ram Mohan Naidu. These links must be investigated by an independent and competent authority.

You have always shown respect for Ajit Dada and his contribution to the country. In this context, I request that Shri Ram Mohan Naidu be asked to resign from his post until the investigation is completed.

This is necessary to ensure that there is no influence or interference in examining whether the DGCA was compromised in any manner in relation to VSR.

I trust that you will take appropriate action in this matter.

With regards,

Yours sincerely,

(ROHIT PAWAR)

...India,
...0001.

...ri Amit Shah, Hon'ble Union Home Minister.

...Society, Bibwewadi-Kondhwa Road, Bibwewadi, PO: Market Yard, District: Pune - 411037
...Federation Bldg.) Karjat-414402 | Jamkhed Office : Girme Complex, Kharda Road Jamkhed- 413201
...ohit_rajendra_pawar_ | 9696 330 330 (कॉल सेंटर) | office@rohitpawar.org

## आमणे आनगाव सापे विकास केंद्रांच्या माध्यमातून भिवंडीचा कायापालट

### एमएसआरडीसीच्या नव्या विकास केंद्रांमुळे भिवंडीतील १७६ गावांचा कायापालट होणार

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २१**

**ठाणे** : नागपूर–मुंबई समृद्धी महामार्गाच्या शेवटच्या टोकावरील आमणे व आसपासच्या भागाचा कायापालट करण्याचा निर्णय महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) घेतला आहे. त्यासाठी आमणे व आनगाव सापे अशी दोन प्राधान्य विकास केंद्रे विकसित केली जाणार आहेत. एमएसआरडीसीच्या नियोजनानुसार, या विकास केंद्रांच्या आराखड्याचे काम सुरू झाले असून सहा महिन्यांत मसुदा तयार करून त्यावर सूचना-हरकती मागविण्याचे नियोजन आहे.

एमएसआरडीसीने मुंबई–नागपूर ७०१ किमी लांबीचा समृद्धी महामार्ग बांधला असून या मार्गालगतच्या परिसरात विकासाची मोठी संधी निर्माण झाली आहे. आमणे व आनगाव सापे विकास केंद्रांत एकूण १७६ गावांचा समावेश असून, एकूण क्षेत्रफळ ४७५ चौ.किमी आहे. या केंद्रांमध्ये लॉजिस्टिक हब, इंडस्ट्रियल पार्क, फार्मा व बायोटेक पार्क, टेक्सटाईल पार्कसारख्या पायाभूत व औद्योगिक सुविधा विकसित करण्यात येणार आहेत. एमएसआरडीसीचे व्यवस्थापकीय संचालक अनिलकुमार गायकवाड यांनी सांगितले की, या प्रकल्पास विशेष प्राधान्य दिले गेले असून विकास केंद्रांची रूपरेषा लवकरात लवकर तयार केली जाईल. टेक कॉम अर्बन मॅनेजमेंट कन्सल्टंट्स प्रायव्हेट लिमिटेडच्या माध्यमातून विकास आराखडा तयार होईल. आराखडा पूर्ण झाल्यानंतर राज्य सरकारच्या मान्यतेनंतर नियोजनबद्ध विकास सुरू केला जाईल. भिवंडीतील अतिक्रमणे दूर करून पायाभूत सुविधा व शहराचा नियोजनबद्ध विकास या केंद्रांद्वारे साध्य करण्याचे उद्दिष्ट एमएसआरडीसीने ठरवले आहे. त्यामुळे या भागाचा कायापालट, औद्योगिक व निवासी विकासासह व्यापक स्वरूपात होणार आहे.




- **मुख्य ठळक मुद्दे**
- **आमणे व आनगाव सापे विकास केंद्रे विकसित केली जाणार.**
- **क्षेत्रफळ : ४७५ चौ.किमी, १७६ गावांचा समावेश.**
- **लॉजिस्टिक हब, इंडस्ट्रियल, फार्मा, बायोटेक व टेक्सटाईल पार्क**
- **विकास आराखडा सहा महिन्यांत तयार होणार**
- **भिवंडीतील अतिक्रमणे दूर करून नियोजनबद्ध विकासाचा उद्देश.**

## माजी महापौर विलास पाटीलांना जमीन

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**भिवंडी (प्रतिनिधी)**

भिवंडी महापालिकेच्या महापौर निवडणूकीत अत्यंत चर्चित राहिलेले व राजकीय गटात किंगमेकर म्हणून ओळखले जाणारे कोणार्क विकास आघाडीचे प्रमुख माजी महापौर विलास आर पाटील यांना न्यायालयाने शुक्रवार ( २०) रोजी सायंकाळी न्यायालयाने जमीन मंजूर करण्यात आला आहे. त्यामुळे त्यांचे कुटुंबातील सदस्य व सर्व सामान्य नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

भिवंडी शहर महापालिकेच्या अत्यंत लक्षवेधी झालेल्या निवडणुकीत माजी महापौर विलास पाटील यांचे कोनार्क विकास आघाडीचे संपूर्ण चार जणांचे पँनल विजयी झाल्यानंतर निघालेल्या विजयी मिरवणुकीत दरम्यान पराभूत उमेदवार व कोनार्क विकास आघाडी च्या कार्यकर्ते मध्ये छत्रपती शिवाजी महाराज चौकात झालेल्या दगडफेक व हाणामारी मध्ये दाखल गुन्ह्यात विलास पाटील यांना ७ फेब्रुवारी रोजी अटकपूर्व जामीन मंजूर



झाला होता. त्यानंतर १३ फेब्रुवारी रोजी रात्री उशिरा ठाणे आर्थिक गुन्हे शाखेने जमीन व्यवहारातील आर्थिक फसवणूक प्रकरणी ताब्यात घेऊन अटक केली.त्याप्रकरणी चार दिवसांच्या पोलिस कोठडी नंतर न्यायालयीन कोठडीत रवानगी केली होती.

या दरम्यान महापौर पदासाठी उमेदवारी अर्ज भरणे व मतदान करणे या दोन्ही वेळा न्यायालयाच्या परवानगीने माजी महापौर नगरसेवक विलास पाटील हे पोलीस बंदोबस्तात भिवंडी महापालिकेत दाखल झाले होते.या प्रकरणी शुक्रवारी सायंकाळी सत्र न्यायालयाने जामीन मंजूर करण्यात आल्याची माहिती अँड नारायण अय्यर यांनी दिली आहे.

## संपादकीय

### संचमान्यता निकषांमुळे ५७ शाळांवर संक्रांत

मुंबईत मराठी माध्यमाच्या शाळांची संख्या सतत घटत आहे, तर अल्पसंख्यांक व अन्य माध्यमांच्या शाळांना मिळणाऱ्या विशेष सवलतींमुळे मराठी शाळा टिकण्यासाठी संघर्ष करत आहेत. सध्या अंदाजे ५७ मराठी शाळा संचमान्यतेच्या जाचक निकषांमुळे बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेने संबंधित शाळांची संचमान्यता तात्पुरती स्थगित ठेवून त्यांना विद्यार्थी संख्या वाढवण्यासाठी मुदत देण्याची मागणी केली आहे. मुंबईत एकूण १७३६ शाळा कार्यरत असून, त्यातील केवळ ३३७ मराठी माध्यमाच्या आहेत. त्याचबरोबर ९४५ शाळा अल्पसंख्यांक संस्थांच्या अंतर्गत असून त्यापैकी ५०५ शाळा भाषिक अल्पसंख्यांक, तर उर्दू १७० आणि ख्रिश्चन १९९ शाळा धार्मिक अल्पसंख्यांक म्हणून नोंद आहेत. शिक्षक परिषदेचे म्हणणे आहे की, आवश्यकता नसताना काही शाळांना नफेखोरीसाठी अल्पसंख्याक दर्जा दिला जात असल्याची शक्यता तपासली जावी. परिषदेने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे आणि मंत्री आशिष शेलार यांच्याकडे विनंती केली आहे की, मराठी शाळांना भौतिक सुविधा, आर्थिक सहाय्य आणि संचमान्यतेत आवश्यक संरक्षण देऊन त्यांची टिकवणूक सुनिश्चित करावी. अन्यथा, मराठी भाषा, संस्कृती आणि प्रादेशिक अस्मितेवर गंभीर परिणाम होऊ शकतो, असे शिक्षक परिषदेने इशारा दिला आहे. शिक्षक परिषदेच्या आक्षेपातून स्पष्ट होते की, मुंबईतील मराठी शाळा केवळ संख्यात्मकदृष्ट्या कमी होत नाहीत, तर त्यांच्या अस्तित्वावरही धोका निर्माण होत आहे. अल्पसंख्यांक व अन्य माध्यमाच्या शाळांना मिळणाऱ्या विशेष सवलतींचा फायदा घेऊन मराठी शाळांची स्थिती दुर्बल केली जात असल्याचा आरोप सतत केला जात आहे. त्यामुळे जर तातडीने संरक्षण आणि धोरणात्मक हस्तक्षेप झाला नाही, तर भविष्यात मुंबईत मराठी माध्यमाच्या शाळा उरल्या नाहीत, तर मराठी भाषेचा प्रसार, सांस्कृतिक वारसा आणि स्थानिक ओळख यावर दीर्घकालीन परिणाम होऊ शकतो. मुंबईतील मराठी शाळा केवळ संख्या कमी करत नाहीत, तर त्यांच्या अस्तित्वावरही गंभीर धोक्याची सावली आहे. अल्पसंख्यांक व इतर माध्यमाच्या शाळांना मिळणाऱ्या विशेष सुविधांचा गैरफायदा घेऊन मराठी शाळांची स्थिती दुर्बल केली जात असल्याचे स्पष्ट होते. जर तातडीने संरक्षण व धोरणात्मक हस्तक्षेप झाला नाही, तर भविष्यात मराठी माध्यमाच्या शाळा उरल्या नाहीत, तर मराठी भाषा, संस्कृती व स्थानिक ओळख या सर्वांवर दीर्घकालीन परिणाम होऊ शकतो. हीच काळजी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या तक्रारीतून अधोरेखित होते, की शहरातील मराठी शाळा टिकवण्यासाठी त्वरित उपाययोजना होणे आवश्यक आहे.






## महावितरणच्या निष्काळजीपणाचा आणखी एक बळी

### शिरोशी सेक्शनमध्ये कंत्राटी कामगाराचा विजेच्या धक्क्याने जागीच मृत्यू

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २१**

**मुरबाड** : मुरबाड तालुक्यातील शिरोशी सेक्शनमध्ये महावितरणच्या (MSEDCL) मेंटेनन्सच्या कामादरम्यान चिमाजी पारधी या कंत्राटी कामगाराचा अचानक विजेच्या धक्क्याने जागीच मृत्यू झाला. या घटनेने परिसरात संतापाची लाट उसळली असून, महावितरणच्या 'रामभरोसे' कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, सुकालवाडी येथे राहणारे पारधी डीपी स्ट्रक्चरच्या मेंटेनन्सवर होते. नियमानुसार काम सुरू असताना लाईन बंद (Permit) असणे आवश्यक होते, मात्र काम सुरू असतानाच कुणीतरी अचानक लाईन सुरू केली. यामुळे पारधी यांचा जागीच मृत्यू झाला. स्थानिक नागरिकांनी महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षाचा आरोप केला असून, कंत्राटी कामगारांना सुरक्षितता साधने पुरवली जातात का, आणि लाईन कोणी चालू केली याचा तपास होणे आवश्यक असल्याचे म्हटले आहे.

या घटनेनंतर पीडित कुटुंबाला न्याय मिळावा, दोषींवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल व्हावा, अशी मागणी जोर धरत आहे. महावितरणच्या अधिकार्यांशी संपर्क साधला असता फोन उचलला गेला नाही. स्थानिकांनी म्हटले की, "महावितरणची यंत्रणा पूर्णपणे कोलमडली असून कामगारांच्या जीवाशी खेळ सुरू आहे. जबाबदारांवर कडक कारवाई होणे गरजेचे आहे."

## ठाण्यात शिवसेनेचे राहुल गांधी विरोधात आंदोलन

### देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी**

**ठाणे** - दिल्ली येथे सुरू असलेल्या आंतरराष्ट्रीय एआय समिट दरम्यान युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी केलेल्या आंदोलनाच्या निषेधार्थ ठाण्यात शिवसेना ठाणे जिल्हा शाखेच्यावतीने आंदोलन करण्यात आले. यावेळी काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्याविरोधात देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा तसेच त्यांची खासदारकी रद्द करावी, अशी मागणी शिवसेनेचे ठाणे जिल्ह्यातील खासदार नरेश म्हस्के यांनी केली आहे. राहुल गांधी वारंवार देशविरोधी वक्तव्य करून भारताची बदनामी करत असल्याचा आरोप करत, यासंदर्भात येत्या लोकसभा अधिवेशनात ठराव मांडणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.




दिल्ली येथे सुरु असलेल्या एआय समिट दरम्यान युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी केलेले चड्डी बनियान आंदोलन, राहूल गांधी वारंवार करत असलेली देशविरोधी विधाने, संसदेचे कामकाज चालू न देणे अशा या सर्व गोष्टींचा निषेध आज टेंभी नाका येथील आनंद आश्रम येथे खासदार नरेश म्हस्के यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना ठाणे जिल्हा शाखेच्या वतीने राहुल गांधी यांच्या प्रतिमेला जोडे मारो आंदोलन करण्यात आले. यावेळी शिवसेनेचे सचिव व नगरसेवक राम रेपाळे, शहरप्रमुख हेमंत पवार, युवा सेनेचे प्रवक्ते राहुल लोंढे यांच्यासह अनेक नगरसेवक, पदाधिकारी, युवासैनिक आणि महिला आघाडीच्या कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

माध्यमांशी बोलताना नरेश म्हस्के म्हणाले, भारत आज आत्मविश्वासाने प्रगतीच्या मार्गावर वाटचाल करत आहे. विज्ञान, तंत्रज्ञान, उद्योग, पायाभूत सुविधा या सर्व क्षेत्रांत देशाने उल्लेखनीय प्रगती केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली विकासाला चालना देणारे अनेक महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबवले जात आहेत. याच पार्श्वभूमीवर दिल्लीमध्ये आयोजित करण्यात आलेल्या जगातील सर्वात मोठ्या एआय समिटमध्ये १८० देशांतील प्रतिनिधी, जागतिक तंत्रज्ञान क्षेत्रातील दिग्गज आणि उद्योगविश्वातील मान्यवर उपस्थित होते.



# कचोरे कोळीवाडा येथील गणेश घाट सुशोभिकरणाचा शुभारंभ

## नगरसेविका रेखा चौधरी यांच्या प्रयत्नांना यश




दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण ठाकुर्ली समांतर रस्त्यावर असलेल्या कचोरे कोळीवाडा येथील खाडी किनारी गणेश घाट सुशोभिकरणाचा शुभारंभ कल्याण ग्रामीणचे आमदार राजेश मोरे यांच्याहस्ते आज करण्यात आला. भारतीय जनता पार्टीच्या कल्याण जिल्हा महिला मोर्चा अध्यक्षा तथा स्थानिक नगरसेविका रेखा चौधरी यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे व प्रयत्नांमुळे या विकासकामाला सुरुवात होत आहे.

कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्राला मोठा खाडी किनारा लाभला असून काही ठिकाणी गणेश घाट तयार करून सुशोभिकरण करण्यात आले आहे. अशाच प्रकारे कचोरे कोळीवाडा येथे असलेल्या खाडी किनाऱ्याचे देखील सुशोभिकरण व्हावे यासाठी नगरसेविका रेखा चौधरी पाठपुरावा करत होत्या. या ठिकाणी सागर देवीचे मंदिर असून गणपती विसर्जन देखील केले जाते. यासाठी मोठ्या प्रमाणात भाविक आणि नागरिक येत असतात. त्यामुळे या परिसराचे सुशोभिकरण करून कायापालट करण्याची मागणी नागरिकांकडून देखील करण्यात येत होती. त्यानुसार रेखा चौधरी यांनी प्रशासनाकडे, खासदार, आमदार यांच्याकडे पाठपुरावा करून या कामासाठी निधी उपलब्ध करून घेतला आहे. त्यानुसार खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, आमदार राजेश मोरे यांनी या कामासाठी तब्बल 5 कोटींचा निधी उपलब्ध करून दिला असून या खाडी किनाऱ्याचे सुशोभिकरण करून रुपडे पालटणार आहे. आज या सुशोभिकरण कामाचा शुभारंभ आमदार राजेश मोरे यांच्याहस्ते भूमिपूजन करण्यात आले असून लवकरच हे काम पूर्ण होणार आहे. या कामासाठी स्थानिक नागरिकांनी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, आमदार राजेश मोरे आणि स्थानिक नगरसेविका रेखा चौधरी यांचे आभार मानले आहेत.

यावेळी आमदार राजेश मोरे, भाजपा महिला मोर्चा जिल्हाध्यक्षा तथा स्थानिक नगरसेविका रेखा चौधरी, शिवसेना उपजिल्हाप्रमुख राजेश कदम, बजरंग दल कल्याण जिल्हा संयोजक राजन चौधरी, भाजपा ग्रामीण मंडळ अध्यक्ष अतिश चौधरी, शिवसेना सचिव संतोष चव्हाण, माजी परिवहन सभापती मनोज चौधरी यांच्यासह स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मौलाना अबुल कलाम आझाद



**श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

आज २२ फेब्रुवारी, देशाचे पहिले शिक्षणमंत्री, थोर देशभक्त, स्वातंत्र्यसेनानी मौलाना अबुल कलाम आझाद यांची पुण्यतिथी. ११ नोव्हेंबर १८८८ रोजी मौलाना अबुल कलाम आझाद यांचा मक्का येथे जन्म झाला. त्यांचा जन्मदिन संपूर्ण भारतात शिक्षण दिन म्हणून साजरा केला जातो. मौलाना आझाद यांचे मूळ नाव अबुल कलाम मोहिनुद्दीन असे होते. अबुल कलाम ही त्यांना पदवी मिळाली होती. अबुल कलाम म्हणजे वाचस्पती. पुढे त्यांनी स्वतःच्या नावापुढे आझाद लावले. त्यांचे वडील हे भारतीय होते तर आई अरब होती. अबुल कलाम आझाद यांना लहानपणापासून शिक्षणाची आवड होती. अगदी लहान वयातच त्यांनी अरबी, फारसी आणि उर्दू या भाषांचे ज्ञान मिळवले. त्यांना तर्कशास्त्र, तत्वज्ञान आणि गणित विषयांची आवड होती तसेच इस्लाम धर्माचा त्यांना गाढा अभ्यास होता. शिक्षण पूर्ण झाल्यावर मौलाना अबुल कलाम आझाद यांनी पत्रकारिता सुरू केली. इंग्रजी सत्तेच्या अन्याय अत्याचाराविरोधात जनजागृती करावी यासाठी त्यांनी अल हिलाल नावाचे उर्दू साप्ताहिक सुरू केले. या साप्ताहिकातून ते इंग्रजांविरुद्ध रान पेटवत असत. त्यामुळे इंग्रज सरकारने त्यावर बंदी घातली. काही दिवसांनी त्यांनी अल बलाग नावाचे दुसरे साप्ताहिक सुरू केले. ते आपल्या लेखणीतून इंग्रज राजवटीविरुद्ध जनतेला जागृत करीत. मुस्लिम समाजानेही स्वातंत्र्याच्या आंदोलनात भाग घ्यावा यासाठी ते मुस्लिम तरुणांना प्रोत्साहित करीत. अबुल कलाम आझाद यांना इस्लाम धर्माचा गाढा अभ्यास असल्याने त्यांनी आपल्या धर्माची तत्वे शेवटपर्यंत जपली असे असले तरी मानवता हाच खरा धर्म आहे आणि सार्वजनिक ठिकाणी मानवता धर्माचेच आचरण करायला हवे असे ते म्हणत. महात्मा गांधींचे ते सच्चे अनुयायी होते. गांधीजींच्या आदेशानेच त्यांनी राष्ट्रीय काँग्रेसमध्ये प्रवेश केला. पुढे ते काँग्रेसचे प्रमुख नेते बनले. इतकेच नाही तर वयाच्या अवघ्या ३५ वर्षी ते काँग्रेसचे अध्यक्षही बनले. काँग्रेसचे अध्यक्ष बनल्यावर त्यांनी हिंदू मुस्लिम ऐक्यावर भर दिला आहे. १९४२ च्या भारत छोडो आंदोलनात त्यांनी भाग घेतला. त्यात त्यांना अटक झाली. तुरुंगवास झाला पण त्यांनी देश स्वातंत्र्य करण्याचे जे व्रत स्वीकारले त्यातून माघार घेतली नाही. १५ ऑगस्ट १९४७ ला देश स्वातंत्र्य झाल्यावर पंडित नेहरूंच्या मंत्रिमंडळात त्यांना शिक्षणमंत्री म्हणून स्थान मिळाले. ते भारताचे पहिले शिक्षणमंत्री बनले. शिक्षणमंत्री म्हणून त्यांनी अत्यंत बिकट परिस्थितीत देशात शिक्षणाचा प्रसार व प्रचार केला. त्यांचे शैक्षणिक धोरण धर्मनिरपेक्ष होते. आधुनिक शास्त्रे आणि आधुनिक विचार यांनाच त्यांच्या शैक्षणिक धोरणात प्राधान्य होते. शिक्षणाचा प्रसार आणि प्रचार करण्यासाठी त्यांनी केलेले कार्य देश कधीही विसरू शकणार नाही. त्यांच्या याच कार्याची दखल घेऊन भारत सरकारने त्यांचा जन्मदिवस शिक्षण दिन म्हणून साजरा करण्यास सुरुवात केली. मौलाना अबुल कलाम आझाद यांचे वक्तृत्व प्रभावी होते तसेच ते उत्तम लेखक होते. कुराणाचा अनुवाद केलेला तरजुमानुल कोरोन हा त्यांचा ग्रंथ खूप प्रसिद्ध आहे. इंडिया विन्स हे त्यांचे आत्मचरित्र त्यांच्या मृत्यूनंतर प्रसिद्ध झाले. मौलाना आझाद यांना परराष्ट्र नीतीचा खूप अभ्यास होता. विशेषतः युरोपच्या तत्कालीन परिस्थितीचे त्यांना खूप ज्ञान होते. ते जितके तल्लख बुद्धीचे होते तितकेच ते मनमिळावू स्वभावाचे होते. लॉर्ड बटमली जे इंग्लंडच्या हाऊस ऑफ लोर्ड्सचे सदस्य होते ते मौलाना आझाद यांच्याविषयी म्हणतात "मौलाना आझाद विशाल मनाचे व्यक्ती होते. देश स्वातंत्र्य व्हावा तसेच देशाची अखंडता कायम राहावी यासाठी त्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली." १९९२ साली केंद्र सरकारने त्यांना मरणोत्तर भारतरत्न हा देशाचा सर्वोच्च पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला. मौलाना आझाद यांचे २२ फेब्रुवारी १९५८ रोजी निधन झाले. पुण्यतिथी दिनी त्यांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन!

# पेण येथे गॅलेक्सी हॉस्पिटलतर्फे मोफत आरोग्य शिबीर संपन्न



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण(प्रतिनिधी)** : पेण शहरातील गॅलेक्सी हॉस्पिटलमध्ये मोफत आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात रुग्णांसाठी मोफत ईसीजी, मोफत औषधे, मोफत रक्त तपासणी करण्यात आली. महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना व आयुष्यमान भारत योजनेचा शुभारंभ करण्यात आला.
दरवर्षीप्रमाणे याही वर्षी शिवजयंती निमित्त गॅलेक्सी मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, पेण येथे मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस मान्यवरांकडून पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले. या शिबिरात रुग्णांसाठी मोफत ईसीजी, मोफत औषधे, मोफत रक्त तपासणी करण्यात आली. पेण तालुक्यातील अनेक नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेतला.यावेळी उपनगराध्यक्ष निवृत्ती पाटील, पेण नगरपालिका मुख्याधिकारी जीवन पाटील, गॅलेक्सी हॉस्पिटलचे डायरेक्टर डॉ .रत्नदीप गवळी, संतोष पाटील, उद्योजक प्रशांत पाटील, उद्योजक रफिक झटाम, विजय मोकल, विनायक पाटील, प्रशांत पोतदार, धनाजी घरत आदी मान्यवर मंडळी तसेच नागरिक उपस्थित होते.

गॅलेक्सी हॉस्पिटलमध्ये यावर्षी पासून महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना व , आयुष्यमान भारत प्रधानमंत्री योजना सुरू झाली असून त्याचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन प्रसंगी गॅलेक्सी हॉस्पिटलचे डायरेक्टर डॉ. रत्नदीप गवळी यांनी केले. यावेळी मुख्याधिकारी जीवन पाटील व उपनगराध्यक्ष निवृत्ती पाटील यांनी शिबिरा विषयी गॅलेक्सी हॉस्पिटलच्या चांगल्या कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. .यावेळी तालुक्यातील अनेक रुग्णांनी याचा फायदा घेतला.

# 'हिंद द चादर' गुरुतेग बहादूर साहिब यांच्या शहिदी समागमनिमित्त प्रश्नमंजुषा स्पर्धा




दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे 21** : गुरू तेग बहादूर यांच्या ३५० व्या शहिदी समागमाच्या निमित्ताने 'हिंद द चादर' या उपक्रमांतर्गत रामकृष्ण विद्यालय येथे विद्यार्थ्यांसाठी वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत गुरू तेग बहादूर साहिब यांच्या जीवनकार्य, त्याग आणि धर्मस्वातंत्र्यासाठी दिलेल्या बलिदानाविषयी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे दिली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला गुरू तेग बहादूर साहिब यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून त्यांच्या शौर्यपूर्ण बलिदानाचे स्मरण करण्यात आले. त्यानंतर प्रश्नमंजुषा स्पर्धेला प्रारंभ झाला. इतिहास, समाजकार्य, धार्मिक सहिष्णुता आणि राष्ट्रनिष्ठा या विषयांवर आधारित प्रश्न विद्यार्थ्यांना विचारण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती, त्याग आणि मानवतेच्या मूल्यांची जाणीव निर्माण व्हावी, तसेच महान संतांच्या कार्याची ओळख नव्या पिढीला व्हावी, यासाठी अशा स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. 'हिंद द चादर' या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये इतिहासाबद्दलची आवड वाढीस लागली असून गुरू तेग बहादूर साहिब यांच्या आदर्शांचा संदेश अधिक प्रभावीपणे पोहोचल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

# राष्ट्रीय भारतीय सैन्य महाविद्यालय प्रवेश 7 जून रोजी परीक्षा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई, दि. 20** : महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय भारतीय सैन्य महाविद्यालय, डेहराडून, उत्तराखंड येथील इयत्ता आठवीच्या प्रवेशासाठी पात्रता परीक्षा 7 जून 2026 रोजी पुणे येथे आयोजित करण्यात येणार आहे. या परीक्षेसाठी मुले व मुली दोघेही अर्ज करू शकतात, असे महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत कळविण्यात आले आहे.

या परीक्षेसाठी उमेदवार 1 जानेवारी 2027 रोजी इयत्ता सातवीमध्ये शिकत असावा किंवा सातवी उत्तीर्ण असावा. यासाठी वयोमर्यादा 11 वर्षे सहा महिने ते 13 वर्षे अशी असून जन्मदिनांक 2 जानेवारी 2014 ते 1 जुलै 2015 दरम्यान असावा. या परीक्षेसाठीचे अर्ज ऑनलाईन किंवा डिमांड ड्राफ्टद्वारे मागविता येणार असून सर्वसाधारण प्रवर्गासाठी शुल्क 600 रुपये आणि अनुसूचित जाती/ जमातीसाठी 555 रुपये आहे. अर्जासोबत आवश्यक कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती जोडणे बंधनकारक आहे.

पूर्ण भरलेले अर्ज 5 एप्रिल 2026 पर्यंत आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, शिवाजीनगर, पुणे येथे स्पीड पोस्टाने किंवा समक्ष जमा करावेत. अर्ज थेट डेहराडून येथे पाठवू नयेत. अधिक माहितीसाठी परीक्षा परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळाला भेट द्यावी, असे आवाहन आयुक्त महेश चोथे यांनी केले आहे.

# ठाणे महापालिकेस 'माझी वसुंधरा अभियान 5.0' पुरस्कार




दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : राज्य शासनाच्या पर्यावरण व वातावरण बदल विभागामार्फत राबविण्यात आलेल्या 'माझी वसुंधरा अभियान 5.0' (कालावधी 1 एप्रिल 2024 ते 31 मार्च 2025) अंतर्गत अमृत गटात 10 लाखांपेक्षा जास्त लोकसंख्या गटामध्ये ठाणे महानगरपालिकेस तिसरा क्रमांक प्राप्त झाला. हा पुरस्कार आज ठाण्याच्या महापौर शर्मिला पिंपळोलकर व महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी महामहिम राज्यपाल आचार्य देवव्रत, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, विधानसभा अध्यक्ष ॲड राहूल नार्वेकर आदी मान्यवरांच्या हस्ते स्वीकारला.

या पुरस्काराचे वितरण डोम, सरदार वल्लभाई पटेल स्टेडियम, वरळी येथे झाले. या पुरस्कार सोहळयास ठाणे महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, उपआयुक्त मधुकर बोडके, सहाय्यक आयुक्त राजेंद्र सोनवणे, सोनल काळे, राहुल दुर्गुडे, प्रदूषण विभागाच्या वैशाली पालकर, ओम परळकर, भारत बिलसोर आदी उपस्थित होते.

1 एप्रिल 2024 ते 31 मार्च 2025 या कालावधीत ठाणे महापालिकेने भुमी घटकांतर्गत 81,734 झाडांची लागवड, 99 नवीन हरित क्षेत्रांची निर्मिती, 729 हेरिटेज वृक्षांची नोंद व सर्वेक्षण, तसेच कचरा व्यवस्थापन व प्लास्टिक बंदी मोहिम प्रभावीपणे राबविली. जैववैद्यकीय, ई-कचरा व C&D कचऱ्याचे मोठ्या प्रमाणात संकलन व पुनर्चक्रिकरण करण्यात आले.

वायू घटकांतर्गत हवेच्या गुणवत्तेचे पाच ठिकाणी नियमित निरीक्षण, हरित फटाक्यांबाबत जनजागृती, बांधकामांवरील प्रदूषण नियंत्रण उपाययोजना तसेच Heat Resilience व Flood Action Plan तयार करण्यात आला. जल संवर्धनांतर्गत रेन वॉटर हार्वेस्टिंग, मलजल प्रक्रिया प्रकल्पांची कार्यक्षमता, विहिरींचे पुनरुज्जीवन आणि तलाव संवर्धनासाठी विविध उपाययोजना करण्यात आल्या.

अग्नी घटकांतर्गत एलईडी पथदिवे, ई-बस सेवा, ईव्ही चार्जिंग स्टेशन, सोलार रूफटॉप आणि सोलार वॉटर हिटर यांसारख्या ऊर्जा बचत उपक्रमांची अंमलबजावणी करण्यात आली.आकाश घटकांतर्गत नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर ई-प्रतिज्ञा घेतल्या असून शेकडो जनजागृती कार्यक्रम राबविण्यात आले. या सर्व उपक्रमांच्या आधारे ठाणे महानगरपालिकेने पर्यावरण संरक्षणात उल्लेखनीय कामगिरी करत राज्यस्तरीय स्पर्धेत तिसरा क्रमांक पटकावला.

# छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त किडस्टार प्री-प्रायमरी स्कूलमध्ये जल्लोष



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त किडस्टार प्री-प्रायमरी स्कूलच्या ठाणे आणि नवी मुंबई या दोन्ही शाखांमध्ये विविध कार्यक्रमांचे उत्साहात आयोजन करण्यात आले. या निमित्ताने दोन्ही ठिकाणी शिवजयंतीची भव्य रॅली काढण्यात आली. रॅलीदरम्यान चिमुकल्या विद्यार्थ्यांनी जोशात घोषणा देत "जय भवानी, जय शिवाजी" चा जयघोष केला. पारंपरिक वेशभूषेत सजलेल्या विद्यार्थ्यांमुळे संपूर्ण परिसर शिवमय झाला होता. अवघ्या २.५ ते ४ वर्षांच्या चिमुकल्यांनी छत्रपतींच्या शौर्यगाथेचे स्मरण करत आपल्या निरागस सहभागातून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. कार्यक्रमात स्कूलच्या संचालिका पूनम मौर्या, मुख्याध्यापिका विद्या मॅडम तसेच शिक्षिका प्रेरणा खाडेकर, धनश्री मोदके, उर्मिला कांबळे आणि रितू कांजले यांचा सक्रिय सहभाग होता. मोठ्या संख्येने पालकांनी उपस्थित राहून कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. शिवजयंतीनिमित्त स्वप्नाली पवार, अर्चना काटेकर, मंजू कटारिया, रूपाली जाधव, आरती शिंदे, दीक्षा शिंदे, शीतल काजरी, सुरेखा शिंदे, राशिका मालुसरे, स्वाती पवार, प्रियंका कुंभार, प्रियंका काठोरे, सुप्रिया मालगडे, सुजाता जाधव, ममता चपके आदी पालकांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष सहकार्य केले. अक्षत, अमृत, इशिता, प्राची, कार्तिकी, शिवन्या, श्रीवंश, वृंदा, श्रीशा, हीवा, सिया, तृषा, रियांश, शिवांश, श्रेया अशा शेकडो विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदवत कार्यक्रमाला रंगत आणली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाचे स्मरण करत संपूर्ण किडस्टार परिवाराने हा दिवस ऐतिहासिक,प्रेरणादायी आणि संस्कारमय वातावरणात साजरा केला.

# भविष्यवेध



**रविवार**
**२२ फेब्रुवारी २०२६**

**मेष**
व्यवसाय योजनेत बदल करणे महत्वाचे आहे. अनुभवी लोकांचे मार्गदर्शन तुमच्या वाढीसाठी उपयुक्त ठरेल आणि सध्या तुमचे उत्पन्न तेवढेच राहील.

**वृषभ**
अतिआत्मविश्वास तुमच्यासाठी हानिकारक असू शकतो, ज्यामुळे तुमच्या कौटुंबिक नातेसंबंधांना धोका निर्माण होऊ शकतो. लोकांशी नीट वागा.

**मिथुन**
कुटुंबातील मालमत्तेशी संबंधित समस्या आज सोडवली जाऊ शकते आणि तुम्हाला वरिष्ठांकडूनही मदत मिळेल. आज घरातील ज्येष्ठ सदस्यांच्या आरोग्याची काळजी घ्या.

**कर्क**
तुमचा व्यवसाय वाढवण्याची कृती करण्यासाठी आज अनुकूल काळ आहे. एखाद्या प्रभावशाली व्यक्तीच्या सल्ल्याने तुम्ही नवीन यश मिळवू शकता.

**सिंह**
दिवस धावपळीचा आणि कठोर परिश्रमाचा असेल, परंतु कामातील यश तुमचा थकवा कमी करेल. गरजू मित्राला मदत केल्याने समाधान मिळेल.

**कन्या**
भावनेच्या भरात महत्वाचे निर्णय घेऊ नका, नंतर पस्तावाल. पालकांनी त्यांच्या मुलांशी मैत्रीपूर्ण संबंध ठेवावेत, कारण जास्त नियंत्रणामुळे विश्वास कमकुवत होतो.

**तुळ**
ऑफिसमध्ये तुमचा कामाचा ताण वाढू शकतो, परंतु तुमचे काम तुमच्या बॉसला प्रभावित करेल. आळसामुळे महत्त्वाच्या कामांकडे दुर्लक्ष करू नका.

**वृश्चिक**
दिवस तुमच्यासाठी आनंदाने भरलेला असणार आहे. लक्ष कामात सुधारणा करण्यावर असेल. मुले त्यांच्या पालकांकडे अधिक लक्ष देतील आणि त्यांचे ऐकतील.

**धनु**
आध्यात्मिक कार्यात थोडा वेळ घालवल्याने मनःशांती मिळेल. जर मालमत्तेच्या समस्येला तोंड देत असाल तर आज निकाल बाजूने येण्याची शक्यता आहे.

**मकर**
तुम्हाला काही नवीन अनुभव मिळू शकतात. कौटुंबिक किंवा वैयक्तिक कारणांमुळे तुम्ही तुमच्या कामाच्या ठिकाणी जास्त वेळ घालवू शकत नाही.

**कुंभ**
सभोवतालच्या लोकांशी सकारात्मक, प्रेमाने वागा. एखाद्या धार्मिक स्थळाला भेट देण्याची योजना आखू शकता, ज्यामुळे शरीर आणि मन दोन्ही आनंदी होतील.

**मीन**
तुमच्या वडिलांकडून आशीर्वाद मिळतील, ज्यामुळे तुमची सकारात्मकता वाढेल. तुमचा आदर आणि सन्मान वाढेल. आज काही आव्हाने येऊ शकतात

# कल्याणच्या एसीपी ऑफिसमध्ये नागाला पकडण्यात सर्पमित्राला यश



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण येथील एसीपी कार्यालय परिसरात नाग जातीचा साप आढळून आला. या सर्पाचे सुरक्षित रेस्क्यू कार्य शिवगर्जना गिरिभ्रमण संस्थाचे सदस्य सतीश बोबडे यांनी यशस्वीरीत्या पार पाडले. या नागाची लांबी सुमारे ५ ते ५.३० फूट असल्याची माहिती त्यांनी दिली. विशेष म्हणजे, गेल्या २५ वर्षांत प्रथमच जोशीबाग परिसरात नाग जातीचा साप आढळल्याने त्यांनी आश्चर्य व्यक्त केले. रेस्क्यू केल्यानंतर सापाला कोणतीही इजा न होता सुरक्षितपणे कल्याण वन विभागाच्या ताब्यात सुपूर्द करण्यात आले.

# कल्याणफाटा ते राजनोली दरम्यान डबल डेकर उड्डाणपूल

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे :** कल्याण-शीळफाटा रस्त्यावरील कल्याण फाटा (शिळफाटा) ते भिवंडीजवळील आग्रा महामार्गावरील राजनोलीपर्यंतचा प्रवास आता सुखकर होणार आहे. या ठिकाणी डबर डेकर उन्नत मार्ग उभारणीसाठी एमएमआरडीएने मंजुरी दिली आहे. या चार पदरी डबल डेकर उन्नत मार्गावरून एकाच वेळी मेट्रो आणि रस्ते वाहतूक होणार आहे.

कोणत्याही कोंडीशिवाय, शहराच्या मध्यवर्ती भागातले वर्दळीचे चौक टाळून या मार्गाने शिळफाटा ते थेट भिवंडी असा प्रवास करता येणे शक्य होणार आहे. या प्रकल्पाचा अंदाजीत खर्च ५९०९.२१ कोटी इतका असून त्याला प्रशासकीय मंजुरी देण्यात आली आहे.



या उन्नत मार्गाची एकूण लांबी १९.४० किलोमीटर इतकी आहे. याची सुरूवात कल्याणफाटा (शिलफाटा जंक्शन) पासून होऊन कटई नाका, पत्री पूल, गोविंदवाडी बायपास मार्गे भिवंडीतील राजनोली जंक्शन येथे समाप्ती होईल.

या मार्गाचा समावेश ठाणे-भिवंडी-कल्याण मेट्रो मार्ग क्रमांक ५, कल्याण-तळोजा मेट्रो मार्ग १२ या दोघांशी होईल. तसेच कल्याण-तळोजा मेट्रो १२ अ या विस्तारीत मार्ग आणि कांजुरमार्ग ते बदलापूर या मेट्रो १४ या प्रस्तावीत मेट्रो मार्गांशीही याचे समन्वय केले जाणार आहे.

**■ कसा असेल उन्नत मार्ग**

या उन्नत मार्गामध्ये पहिल्या स्तरावर वाहनांसाठी रस्ता असणार आहे. तर दुसऱ्या स्तरावर मेट्रो मार्गिका असणार आहे. या मार्गावर आठ ठिकाणी प्रवेश (इंट्री) आणि निर्गमन (एक्झिट) रस्ते (रॅम्प) प्रस्तावित आहेत. या मार्गात २ रेल्वे उड्डाणपूल (पलावा-दिवा पनवेल आणि पत्री पूल क्रॉसिंग) तसेच दोन प्रमुख पूल, देसाई खाडी आणि उल्हास नदी (दुर्गाडी परिसर) प्रस्तावित आहेत.

# बदलापूरात गर्भाशय बीज विक्रीचे रॅकेटचा भांडाफोड

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**बदलापूर :** बदलापूर पूर्वेतील जोवेली परिसरात गरजू महिलांना पैशांचे अमिष दाखवून त्यांच्या गर्भाशयातील स्त्री बीज (अंडी) वाढवून त्यांची बेकायदेशीर विक्री करणारे रॅकेट उघडकीस आले आहे.

डॉक्टरांच्या योग्य सल्ल्याविना बेकायदेशीर पद्धतीने सोनोग्राफी करून महिलांच्या गर्भाशयातील अंडी काढली जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी उपजिल्हा रुग्णालयाच्या मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. ज्योत्सना सावंत यांनी बदलापूर पूर्व पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली असून तीन महिलांना अटक करण्यात आली आहे.

जोवेली भागातील नॅनो सिटी येथील एका इमारतीत सुलक्षणा गाडेकर यांच्या घरातून हे रॅकेट चालत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार बुधवारी बदलापूर पूर्व पोलिसांनी डॉ. ज्योत्सना सावंत यांच्या वैद्यकीय पथकासह संयुक्त धाड टाकली.

धाडीत आरोपीच्या घरातून स्त्री बीजांची वाढ करण्यासाठी वापरली जाणाऱ्या ( लसी ) इंजेक्शन सापडली. गाडेकर ही गरजू महिलांना पैशांचे आमिष दाखवून त्यांची सोनोग्राफी करून घेत असे. इंजेक्शन देऊन गर्भाशयात स्त्री बीजांची वाढ झाल्यानंतर त्या महिलांना आयव्हीएफ सेंटरमध्ये पाठवले जात असल्याची माहिती तपासात समोर आली आहे. तेथे शस्त्रक्रिया विभागात अंडी काढून त्यांची विक्री केली जात असल्याचे पोलिसांनी सांगितले.

प्रकरणी पोलिसांनी सुलक्षणा गाडेकर (४४), अश्विनी चाबुकस्वार (२९) आणि मंजुषा वानखेडे (४६) या तिघींना अटक केली असून रॅकेटमध्ये आणखी काही जणांचा सहभाग आहे का याचा तपास सुरू आहे. या प्रकरणात २० हून अधिक महिलांचा वापर झाल्याचा अंदाज असून त्यांना २५ ते ३० हजार रुपये दिले जात होते. अधिक आरोपींचा शोध सुरू आहे, अशी माहिती परिमंडळ चारचे पोलिस उपायुक्त सचिन गोरे यांनी दिली.

# ठाण्यात शासकीय आरोग्य सेवेचा नवीन मानदंड

**जिल्हा आरोग्य विभागाने यशस्वी केल्या तब्बल ४७,५०५ शस्त्रक्रिया**

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २१**

**ठाणे :** जानेवारी २०२५ ते जानेवारी २०२६ या कालावधीत ठाणे जिल्हा आरोग्य विभागाने तब्बल ४७,५०५ शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पाडल्या. यामध्ये १४,४१९ मेजर आणि ३३,०८६ मायनर शस्त्रक्रिया समाविष्ट आहेत, ज्यामुळे सार्वजनिक आरोग्य सेवेचा नवा मानदंड निर्माण झाला आहे.

सिव्हिल हॉस्पिटल ठाणे येथे सर्वाधिक ४,३४१ मोठ्या शस्त्रक्रिया पार पडल्या, तर सेंट्रल हॉस्पिटल उल्हासनगर-३ येथे २,७०५ आणि भिवंडी उपजिल्हा रुग्णालयात २,६४३ मेजर शस्त्रक्रिया यशस्वी झाल्या. मायनर शस्त्रक्रियेत भिवंडी उपजिल्हा रुग्णालयाने १२,६१० ऑपरेशन्स करून आघाडी घेतली, उल्हासनगर-३ येथे ६,०७२ आणि सिव्हिल हॉस्पिटल ठाणे येथे ३,२२६ लहान शस्त्रक्रिया पार पडल्या.

ग्रामीण भागातही आरोग्य सेवेचा मजबूत पाया दिसून आला आहे. शहापूर, बदलापूर, अंबरनाथ, मुरबाड, गोवेली, टोकावडे इत्यादी ग्रामीण रुग्णालयांमध्ये शेकडो शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पडल्या. प्राथमिक उपचार उपलब्ध करून देतानाच गंभीर रुग्णांना तातडीने उच्चस्तरीय केंद्रात रेफर करण्याची सुसूत्र यंत्रणा राबविण्यात आली आहे. विशेष प्रकरणांत शहापूर येथे एका तरुणाची जोखमीची ॲपेंडिसेक्टॉमी यशस्वी झाली, सिव्हिल हॉस्पिटल ठाणे येथे झाडावरून पडलेल्या मुलाचा हात वाचवला, तसेच ७८ वर्षीय महिलेची स्तनातील कर्करोगाची गाठ काढून तिचे प्राण वाचवण्यात डॉक्टरांना यश आले. ठाणे जिल्हा आरोग्य विभागाची ही कामगिरी 'आरोग्य हीच खरी संपत्ती' या तत्वाची प्रचिती देणारी ठरली असून, शहरी व ग्रामीण भागातील आरोग्य सुविधांमध्ये समतोल साधण्यात यश आले आहे.



# अनिश्चित काळासाठी बंद असलेली मोनोरेल पुन्हा सेवेत दाखल होणार

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २१**

**मुंबई :** चेंबूर - संत गाडगे महाराज चौक मोनोरेल मार्गिकची सेवा सप्टेंबर २०२५ पासून बंद आहे. अत्याधुनिकीकरण करण्यासाठी मोनोरेल मार्गिकवरील सेवा अनिश्चित काळासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) बंद केली होती. मात्र, आता अत्याधुनिकीकरणाचे काम अंतिम टप्प्यात असून या सेवेला स्वतंत्र सुरक्षा मूल्यांकनकर्ता (आयएसए) यांचे प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे. आता सेवानिवृत्त मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्त (सीएमआरएस) यांची नियुक्ती करून त्यांच्याकडून सुरक्षा प्रमाणपत्र प्राप्त करणे बाकी आहे. ही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर मोनोरेल पुन्हा सेवेत दाखल होणार आहे.

मुंबईतीलच नव्हे तर देशातील एकमेव चेंबूर संत गाडगे महाराज चौक मोनोरेल मार्गिका म्हणून ओळख असलेली ही सेवा सुरुवातीपासूनच तोट्यात आहे. १९.५४ किमी लांबीच्या या मोनोरेल मार्गिकवर अपघात आणि दुर्घटनांची मालिकाही सुरूच आहे. ऑगस्ट-सप्टेंबर २०२५ मध्ये झालेल्या दुर्घटनांनंतर एमएमआरडीएने मोनोरेल गाड्या आणि प्रणालीमध्ये बदल, तसेच अत्याधुनिकीकरण करण्याचा निर्णय घेतला.

या कामासाठी सेवा पूर्णपणे अनिश्चित काळासाठी बंद करण्याचाही निर्णय घेण्यात आला. त्यानुसार सप्टेंबर २०२५ पासून मोनोरेल मार्गिकचे संचालन बंद आहे. सेवा बंद कालावधीत मोनोरेलच्या ताफ्यात नवीन देशी बनावटीच्या गाड्या दाखल करण्यात आल्या आहेत. तसेच जुन्या गाड्यांमध्ये आणि त्यांच्या प्रणालीमध्ये आवश्यक बदल करण्यात आले आहेत.

या गाड्यांची आणि नवीन प्रणालीची चाचणी सध्या सुरू आहे. दरम्यान, मोनोरेल सेवा लवकरात लवकर पुन्हा सुरू करण्याचा निर्णय एमएमआरडीएने घेतला आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार एप्रिल-मे महिन्यात सेवा पुन्हा सुरू होण्याची शक्यता आहे. त्यामुळे एमएमआरडीएने मोनोरेल लवकरच सेवेत दाखल होणार असल्याचे जाहीर केले आहे.

# हिंद द चादर' उपक्रमातून शाळा क्र. 33 मध्ये उलगडला गुरु तेग बहादूर साहिब यांचा जीवनपट

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे (21 ) –** 'हिंद द चादर' उपक्रमांतर्गत ठाणे महानगरपालिकेच्या शाळा क्र. 33 मध्ये गुरु तेग बहादूर साहिब यांचा जीवनपट दाखविण्यात आला.

या माहितीपटाच्या माध्यमातून गुरु तेग बहादूर साहिब यांचे कार्य, त्याग आणि मानवतेसाठी दिलेले बलिदान विद्यार्थ्यांसमोर उलगडण्यात आले. कार्यक्रमादरम्यान शिक्षकांनी विद्यार्थ्यांना गुरुजींच्या जीवनातील प्रेरणादायी प्रसंग समजावून सांगितले. धर्मस्वातंत्र्य आणि मानवाधिकारांच्या रक्षणासाठी दिलेल्या त्यांच्या सर्वोच्च बलिदानाची माहिती ऐकून विद्यार्थ्यांना मिळाली.

'हिंद द चादर' या उपक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रप्रेम, सामाजिक बांधिलकी आणि सहिष्णुतेची भावना रुजविणे हा आहे. अशा शैक्षणिक उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना इतिहासातील महान व्यक्तिमत्त्वांची ओळख होऊन त्यांच्या जीवनातून प्रेरणा घेण्याची संधी मिळते. कार्यक्रमास शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवर्ग तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांच्या माथी दंडाचा फटका ■ न्यायासाठी आमदार संजय केळकरांकडे धाव

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे :** मुंबई विद्यापीठाने कासारवडवली येथील एका शिक्षण संस्थेला विलंबित प्रवेशाच्या कारणावरून आकारलेला लाखो रुपयांचा दंड डिग्री कॉलेजने २७ विद्यार्थ्यांच्या माथी मारण्याचा प्रयत्न केल्याने विद्यार्थ्यांनी आमदार संजय केळकर यांच्याकडे धाव घेऊन न्याय मिळवून देण्याची मागणी केली आहे.

आमदार संजय केळकर यांच्या जनसेवकाचा जनसंवाद या ८७व्या कार्यक्रमात कासारवडवली येथील एका शिक्षण संस्थेच्या डिग्री कॉलेजमधील विद्यार्थ्यांनी उपस्थित राहून त्यांची व्यथा मांडली. पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी मुंबई विद्यापीठाकडे उशिरा प्रवेश अर्ज दिल्याचा ठपका ठेवून विद्यापीठाने महाविद्यालयास दंड आकारला आहे. विद्यापीठाच्या नियमानुसार २१ ते ४० विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणांमध्ये त्रुटी आढळल्यास महाविद्यालयास दहा लाख रुपये दंड अधिक प्रती विद्यार्थ्यांच्या शिक्षण शुल्काच्या दुप्पट रकमेची दंडात्मक आकारणी करण्यात यावी. तसेच महाविद्यालयाच्या प्रवेश क्षमतेत पुढील शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून २५ टक्के इतकी कपात करून चौकशी समिती गठित करावी. तसेच प्रत्येक विद्यार्थ्यास पाच हजार रुपये दंड आकारण्यात यावा. याबाबतचे पत्र विद्यापीठाने संबंधित शिक्षण संस्थेस पाठवले आहे. मात्र संस्थेने हा लाखोंचा दंड विद्यार्थ्यांच्या माथी मारण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे हवालदिल झालेल्या विद्यार्थ्यांनी या प्रकरणी न्याय मिळण्यासाठी श्री.केळकर यांना साकडे घातले आहे.




याबाबत श्री.केळकर यांनी विद्यार्थ्यांना न्याय देण्यासाठी विद्यापीठाच्या उप कुलगुरूंना पुढील आठवड्यात भेटून या प्रकरणाचा पाठपुरावा करणार असल्याचे सांगितले. काही संस्था मिशन म्हणून तर काही कमिशनसाठी काम करत आहेत. विविध शैक्षणिक संस्था पालकांना भूलथापा देऊन मुलांना प्रवेश देतात, मात्र वर्ष अखेरीस विद्यार्थ्यांवर विविध त्रुटींमुळे परीक्षेपासून वंचित राहण्याची तसेच आर्थिक भुर्दंड सहन करण्याची वेळ येते. त्यामुळे पालकांनी सावध रहाण्याचे आवाहन श्री.केळकर यांनी केले. संस्थांनी दिलेल्या मुदतीत प्रवेश द्यावेत. मात्र काही संस्था विद्यापीठाकडून सवलत मिळेल या आशेने विद्यार्थ्यांना मुदतीनंतरही प्रवेश देतात. त्याचा फटका विद्यार्थ्यांना बसतो, असेही श्री.केळकर म्हणाले.

दोन वर्षांपूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीत विविध कामांसाठी खाजगी नेमणुका करण्यात आल्या होत्या. यात काही वाहनचालकांच्याही नेमणुका झाल्या. मात्र अद्याप यातील सात वाहनचालकांना त्यांच्या कामाचा मोबदला मिळालेला नसून ते जिल्हाधिकारी कार्यालयाचे खेटे घालत आहेत. या चालकांनी श्री.केळकर यांची जनसेवकाचा जनसंवाद या कार्यक्रमात भेट घेऊन दिलासा देण्याची विनंती केली. यावेळी श्री.केळकर यांनी तत्काळ संबंधितांना फोन करून ही बाब निदर्शनास आणून दिली. या वाहनचालकांना तीन चार दिवसांत त्यांचा थकीत मोबदला मिळणार असल्याचे ते म्हणाले.

जनसेवकाचा जनसंवाद या कार्यक्रमात शासकीय जमिनीवरील झालेले अतिक्रमण तोडल्यानंतर पुन्हा त्या जागी बांधकामे झाल्याची तक्रार प्राप्त झाली होती. महसूल विभागातील अधिकारी या बांधकामांकडे दुर्लक्ष करीत असल्याने ही बांधकामे होत असल्याचे श्री.केळकर म्हणाले. याबाबत संबंधितांशी बोलून तातडीने बांधकामे निष्कासित करण्यास सांगितल्याचे श्री.केळकर म्हणाले.

# खडवली आरोग्य केंद्रात उपचार नाकारला ?

## सामाजिक कार्यकर्तें सीईओकडे तातडीने कारवाईची मागणी

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २१**
**कल्याण ● संजय कांबळे**

सध्या कल्याण पंचायत समिती सह जिल्हा आरोग्य विभाग या ना त्या कारणामुळे भलताच वादग्रस्त व चर्चेचा विषय ठरत असताना याच विभागाच्या कल्याण पंचायत समितीच्या आरोग्य विभागांतर्गत येणा-या प्राथमिक आरोग्य केंद्र खडवली मध्ये इमरज्री च्या नावाखाली चक्क एका महिला पेशंट ला उपचार नाकारण्याचा प्रकार घडला असून संबधित या वैद्यकिय अधिका-यावर कारवाई करण्याची मागणी मुख्यमंत्री समृध्द अभियान मुल्यमापन समितीचे सदस्य तथा पत्रकार संजय कांबळे यांनी सीईओंच्याकडे लेखी स्वरुपात करणार असल्याचे सांगितले. याबाबत सविस्तर माहिती अशी की वाशिंद येथील मोलमजुरी करणा-या ३०वर्षीय महिलेला अचानक उलटी, चक्कर, अशक्तपणा जाणवू लागल्याने तिला खडवली स्टेशन येथे उतरले, सुदैवाने तेथे पत्रकार संजय कांबळे हे उपस्थित असल्याने त्यांनी या महिलेला रिक्षातून खडवली प्राथमिक आरोग्य




केंद्र येथे नेले, यावेळी सांयकाळचे ५:१५ते ५:२०वाजले होते, पीएचसी उघडीच होती, रजिस्टर टेबलवर कुणीच नव्हते, मात्र त्या शेजारील रुममध्ये डॉक्टर मोबाईलवर गेम खेळत होते किंवा काहीतरी करत होते, श्री कांबळे पुढे जाऊन डॉंक्टर आहेत का?असे विचारले असता, मीच डॉंक्टर आहे, बोला, म्हटल्यावर महिला पेंशट आहे, त्याला उलट्या, चक्कर येणे व अशक्तपणा जाणवतो आहे, आपण चेक करा, असें म्हणताच, आम्ही फक्त ईमरज्नशी पेंशट ला बघतो तुम्ही सोमवारी या, असे उत्तर दिले, यावर श्री कांबळे यांनी अहो हा पण तसाच पेंशट आहे, कृपया तपासा अशी वांरवार विनंती केली, परंतु ते आपल्या भूमिकेवर ठाम राहिले, यानंतर काही वेळातच हा प्रकार श्री कांबळे यांनी वैद्यकीय अधिकारी डॉ गीता कदम यांना सांगितला, यावर असे व्हायला नको, तेथे डॉ जाधव व सिस्टर उपलब्ध होत्या असे बोलून खांदे उडवून मोकळया झाल्या. विशेष म्हणजे मागील आठवड्यात आमदार किसन कथोरे यांनी तालुका आरोग्य विभागाची आढावा बैठक गोवेली येथे घेतली होती, तेंव्हा ,गोरगरीबांना आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याच्या सूचना त्यांनी दिल्या होत्या, त्याचे काय झाले?यानंतर निळजे प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी व सेंट्रल हाँस्पिटलच्या कर्मचारी यांच्या हाणामारी झाली होती, तोपर्यंत कालपरवा दहागाव प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉक्टर उशिरा येत असल्याची तक्रार एका पेंशटने सभापती रविंद्र घोंडविंदे सर यांच्या कडे केली होती. तो पर्यंत आज हा प्रकार घडला. या अगोदर देखील कल्याण तालुका आरोग्य विभाग कमी वादग्रस्त ठरला नाही, सामाजिक कार्यकर्ते महेश देशमुख, राम केणे यांनी सीईओ कडे लेखी तक्रार केल्या आहेत. एकूणच काय तर जिल्ह्यासह कल्याण तालुका आरोग्य विभागात अनागोंदी, भोंगळ कारभार सुरु असल्याचे विविध घटनावरुन दिसून येत आहे, जिल्हा आरोग्य अधिकां-याचे तालुका आरोग्य अधिकारी, तालुका आरोग्य अधिका-यांचे ,प्राथमिक आरोग्य अधिकारी,आणि प्राथमिक आरोग्य अधिका-याचे इतर अधिकारी, व कर्मचारी असे कोणावर नियंत्रण नसल्याचे स्पष्ट जाणवत आहे, परंतु या विरोधात आपण लवकरच सीईओ रणजित यादव सर यांची भेट घेऊन तक्रार करणार असल्याचे पत्रकार कांबळे यांनी सांगितले




# कल्याण-डोंबिवली परिवहन सेवेचा मार्ग क्रमांक 3 प्रवाशांच्या सेवेत रुजू

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २१**

**कल्याण :** कल्याण-डोंबिवली महापालिका परिवहन उपक्रमांतर्गत गेल्या अनेक दिवसांपासून बंद असलेली मार्ग क्रमांक ३ (साई चौक–सह्याद्रीनगर–कल्याण स्थानक) बससेवा गुरुवारपासून पुन्हा सुरू झाली आहे. ही सेवा प्रवाशांच्या सोयीसाठी शिवसेना शहरप्रमुख तसेच परिवहन कामगार कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष रवी पाटील यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे रुजू झाली. खडकपाडा येथील साई चौक येथे या बससेवेचा मोठ्या उत्साहात शुभारंभ करण्यात आला. ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते नारळ फोडून व बसवर भगवा झेंडा दाखवून प्रवासाचा प्रारंभ करण्यात आला. या कार्यक्रमात शिवसेना उपशहरप्रमुख सुनील वायले, नगरसेवक किरण भांगले, रूपेश सकपाळ, नगरसेविका शालिनी वायले, प्रमिला पाटील, प्रज्ञा वायले, युवासेना पदाधिकारी अनिरुद्ध पाटील, प्रथमेश पाटील यांच्यासह मोठ्या संख्येने शिवसैनिक आणि स्थानिक नागरिक उपस्थित होते.

या बससेवेच्या पुनर्संचालनामुळे स्थानिक रहिवाशांना साई चौक–सह्याद्रीनगर–कल्याण स्थानक या मार्गावर प्रवास अधिक सुलभ झाला असून, विद्यार्थ्यांपासून वृद्ध नागरिकांपर्यंत सर्व प्रवाशांना मोठा फायदा होणार आहे. शिवसेनेच्या या प्रयत्नामुळे स्थानिक सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेची कार्यक्षमता आणि प्रवाशांचा समाधान वाढले आहे.

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
https://www.facebook.com/jeevandeepnews/
https://www.instagram.com/thane_jeevandeep/
https://x.com/Jeevandeepvarta
https://jeevandeepvarta.com/

जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
सौ.कमलताई किसन कथोरे कॉलेज, म्हसा मुंबई विद्यापीठाशी संलग्न
ADMISSION OPEN
११ वी व १२ वी
ARTS, COMMERCE, SCIENCE
UNDER GRADUATE: B.A., B.Com., B.Sc. CHEMISTRY, B.Sc. MATHS, BAF, BMS
POST GRADUATE: M.Sc. CHEMISTRY, M.Com. ADVANCED ACCOUNTANCY, M.A. MARATHI, M.A. ECONOMICS, M.A. SOCIOLOGY, M.A. HISTORY
Look forward to a BRIGHTER FUTURE
7038658191
9130580111

# महापौर शर्मिला पिंपळोलकर यांच्या हस्ते 'रेबीज मुक्त ठाणे' मोहिमेचा शुभारंभ

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे (२०):** ठाणे शहरातील भटक्या कुत्र्यांच्या वाढत्या संख्येवर नियंत्रण आणण्यासाठी ठाणे महानगरपालिका व प्राणी मित्र संस्थांच्या वतीने विशेष 'रेबीज मुक्त' मोहिम राबविण्यात येत आहे. या मोहिमेचा शुभारंभ व



फलकाचे अनावरण आज महापौर शर्मिला पिंपळोलकर यांच्या हस्ते महापालिकेत करण्यात आले. यावेळी उपायुक्त मनिष जोशी, शिवसेना गटनेते पवन कदम, नगरसेविका मीनल संख्ये मुख्य वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. प्रसाद पाटील, पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. क्षमा शिरोडकर तसेच रेबीज मुक्त मोहिमेसाठी तयार करण्यात आलेले पथक उपस्थित होते.

'रेबीज मुक्त ठाणे' अशी ही योजना असून यासाठी 50 जणांचे विशेष पथक तयार करण्यात आले आहे. या पथकाच्या माध्यमातून 7 दिवसांत 5000 भटक्या कुत्र्यांना रेबीज लसीकरण करण्यात येणार असल्याची माहिती मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रसाद पाटील यांनी दिली.

लसीकरण केलेल्या भटक्या कुत्र्यांच्या गळ्यात केशरी रंगाचा रिफ्लेक्टर पट्टा बांधण्यात येणार आहे. येत्या महिनाभरात 25000 भटक्या कुत्र्यांचे लसीकरण करण्याचे उद्दिष्ट असून पुढील काळातही ही मोहिम सातत्याने राबविण्यात येणार असल्याचे डॉ. पाटील यांनी नमूद केले.

# होळीनिमित्त मनरेगा मजुरांसाठी तातडीने रु. 67 कोटी निधी मंजूर

## - रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई, दि. 20** - होळीनिमित्त आदिवासी बांधवांना दिलासा देण्यासाठी राज्य शासनाने रोजगार हमी योजनेअंतर्गत मजुरांना तातडीने मजुरी अदा करण्यासाठी 67 कोटींचा निधी मंजूर केला आहे. सदर निधीची देयके कोषागाराकडे सादर करण्यात आली असून पुढील दोन ते तीन दिवसांत मजुरीची रक्कम थेट मजुरांच्या बँक खात्यात जमा करण्यात येईल, अशी माहिती रोजगार हमी योजना विभागाचे मंत्री भरत गोगावले यांनी दिली.

`महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत अकुशल मजुरांना रोजगार उपलब्ध करून दिला जातो. मेळघाट, पालघर तसेच इतर आदिवासीबहुल जिल्ह्यांमध्ये मजुरांना काम देताना वाढीव लेबर बजेट मान्यतेचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे विचाराधीन असल्यामुळे काही कालावधीपासून मजुरी अदा करणे प्रलंबित होते. या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.

19 फेब्रुवारी 2026 रोजी केंद्र शासनाने राज्याच्या 13 कोटी मनुष्यदिवसांच्या लेबर बजेटमध्ये वाढ करून सुधारित 16 कोटी मनुष्यदिवसांच्या बजेटला मान्यता दिली आहे. त्यामुळे मार्च अखेरपर्यंत मजुरांना नियमित रोजगार उपलब्ध होऊन मजुरी वेळेत अदा केली जाईल, असेही मंत्री गोगावले स्पष्ट केले.

# कासणे येथील सात फूटी अजगराला सर्पमित्रांकडुन जिवदान



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पडघा(प्रतिनिधी) :** भिवंडी तालुक्यातील मुंबई नाशीक महामार्गालगत व दुर्गम भागात असलेल्या कासणे गावाजवळ आढळलेल्या एका सात फुट लांब असलेल्या भल्या मोठ्या अजगराला सुरक्षित पकडुन सर्पमित्रांकडुन जिवदान देण्यात आले.

मुंबई नाशिक महामार्गावरील हॉटेल मोतीमहल च्या मागे अनंत पवार यांच्या साईटवर एक सात फुटाचा भला मोठा अजगर आढळल्याने परिसरात घबराटीचे वातावरण पसरले होते. त्यामुळे परिसरातील सर्पमित्रांना पाचारण करण्यात आले होते. यावेळी सर्पमित्र मयुर बजागे वांद्रे व रवी दांडगे पडघा यांनी त्या ठिकाणी धाव घेत अल्पावधीतच या भल्या मोठ्या अजगराला मोठ्या शिताफीने सुरक्षित पकडुन पडघा वनपरिक्षेत्र कार्यालयाचे वनपरिक्षेत्र अधिकारी रमेश रसाळ यांच्या मार्गदर्शनाखाली अजगराला जंगलातील नैसर्गिक अधिवासात सोडून देण्यात आले.

# कल्याण पूर्वेतील शिवप्रेरणा यात्रेत ५०० हून अधिक वारकऱ्यांचा जागर

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : सार्वजनिक शिवजयंती उत्सव मंडळ कल्याण पूर्व यांच्या वतीने शिवजयंती निमित्त सिध्दार्थ नगर येथील कर्मवीर दादासाहेब गायकवाड क्रीडांगणावर शिवजयंती उत्सव २०२६ मोठ्या उत्साहात भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला वारकरी संप्रदायाच्या सुमारे ५०० हून अधिक वारकरयांनी सहभाग घेवून हरिनामाचा गजर केला. या उत्सवात कल्याण पूर्वेच्या नावलौकिकात भर घालणारे आचार्य प्रल्हाद शास्त्री महाराज तसेच संजय राघो काळोखे यांना कल्याणकरांसाठी मानाचा म्हणून ओळखला जाणार 'शिवकल्याण पुरस्कार २०२६' हा पुरस्कार देवून त्यांना सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेच्या पूजनाने करण्यात आली. त्यानंतर सुमारे ५०० वारकऱ्यांच्या उपस्थितीत सामूहिक हरिपाठ करण्यात झाला. या समयी हरिनामाच्या गजराने परिसर भक्तिमय झाला होता. या वेळी आपल्या कतृत्वाने उल्लेखनीय कार्य करणारे आचार्य प्रल्हाद शास्त्री महाराज तसेच संजय काळोखे यांना आमदार सुलभा



गायकवाड, पोलीस उपायुक्त अतुल झेंडे, एसीपी कल्याणजी घेटे या मान्यवरांच्या हस्ते 'शिवकल्याण पुरस्कार २०२६ ' हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. . सन्मान चिन्ह, शाल आणि श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप होते.

कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण ठरलेली छत्रपती शिवाजी महाराजांच्या भव्य मिरवणूक व प्रेरणा यात्रा . या प्रेरणा यात्रेत द्वारका विद्या मंदिर नांदीवली, नुतन ज्ञान मंदीर, मॉडेल कॉलेज आणि हायस्कुल, जय हनुमान दांडपट्टा पथक, तिसाई बिटस् बॅण्ड पथक, बासरीवाला ढोल ताशा पथक, मैत्रेय संगत, सहयोग सामाजिक संस्था, शाम बाबु गुप्ता आणि पथक, आदि संस्था संघटनांच्या सहभागासह कल्याण शहर वारकरी सांप्रदाय प्रबोधन ट्रस्ट या आध्यात्मिक संस्थेचे ५००हून अधिक वारकरी आणि सेवेकरी सहभागी झाले होते. ढोल-ताशांच्या गजरात आणि जयघोषात निघालेल्या या मिरवणुकीत शिवप्रेमी नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. "नामात विठ्ठल, कर्मात शिवराय" या संकल्पनेनुसार आणि ह.भ.प. जगन्नाथ रामभाऊ नेहरकर महाराज यांच्या अध्यक्षते खाली साजरा झालेल्या या शिवजयंती उत्सवात भक्ती आणि शौर्य यांची सांगड घालणारा हा उत्सव यशस्वीरीत्या पार पडल्याची भावना मंडळाचे विश्वस्त नरेंद्र सुर्यवंशी आणि विष्णू जाधव यांनी व्यक्त केली. या शिव प्रेरणा यात्रेत आमदार सुलभा गायकवाड, नगसेवक रमेश जाधव, निलेश शिंदे, सचिन पोटे, नगसेविका मनिषा गायकवाड, माजी नगरसेवक अभिमन्यू गायकवाड यांच्यासह संजय मोरे, सुभाष म्हस्के, राजु अंकुश, रमाकांत देवळेकर, विवेक जगताप, प्रभाग ४ जे च्या सहाय्यक आयुक्त सविता हिले आदी मान्यवर आणि विविध संस्था संघटनांचे प्रतिनिधी, शिवप्रेमी नागरीक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# बार व रेल्वे स्टेशन परिसरात पोलिसांची एजन्ट व वारांगना विरोधात कारवाई

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : शुक्रवारी रात्री सुमारे १२ वाजण्याच्या सुमारास रिगल बारमध्ये अश्लील नृत्य सुरू असल्याची गुप्त माहिती मिळाल्यानंतर ही कारवाई करण्यात आली. एसीपी सुहास हेमाडे यांनी स्वतः पथकासह घटनास्थळी पोहोचत अचानक तपासणी केली. या कारवाईत पोलीस निरीक्षक दत्तात्रय गुंड, एपीआय संपत फडोळ, के. आर. पाटील तसेच इतर अधिकाऱ्यांचा समावेश होता.

छाप्या दरम्यान बारमध्ये २३ मुली आढळून आल्याची



प्राथमिक माहिती समोर आली आहे. संबंधित व्यवस्थापन व इतरांविरोधात मानपाडा पोलीस ठाणे येथे गु.रजि.न.१९९/२६ भा.न्या.स.क 296,223,54,3(5) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून प्रकरणाचा अधिक तपास सुरू आहे. त्याचप्रमाणे कल्याण रेल्वे स्टेशन परिसरात वेश्या व्यवसाय करणाऱ्या विरुद्ध महात्मा फुले चौक पोलीस ठाणे मार्फत कारवाई करण्यात आली आहे. या कारवाई मध्ये ४ एजन्ट आणि १० पिडीत अशा वारांगना १४ महिलांवर पिटा अन्वये कारवाई करण्यात आली आहे. महात्मा फुले चौक पोलीस ठाणे येथे गुरजिन. 107/26 बीएनएस कलम 143(3),3(5) सह अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम सन 1956 चे कलम 4 व 5 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शहरातील बार व तत्सम आस्थापनांवर पुढील काळातही तपासणी मोहीम सुरू राहणार आहे.

# प्रभावी डेटा व्यवस्थापनातून शासन होणार नागरिकाभिमुख

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई,दि.२० :**डिजिटल युगात डेटा हीच खरी शक्ती असून प्रभावी डेटा व्यवस्थापनामुळे शासन अधिक पारदर्शक, वेगवान आणि नागरिकाभिमुख होत असल्याचे भारत सरकारच्या संचार मंत्रालयाचे उपमहासंचालक सुमनेश जोशी यांनी सांगितले.

भारतीय लोकप्रशासन संस्था महाराष्ट्र प्रादेशिक शाखेच्या वतीने मंत्रालयातील अधिकाऱ्यांसाठी परिषद सभागृहात आयोजित "डिजिटल गव्हर्नर मेड सिंपल व्हॉट एव्हरी ऑफिस मस्टनो" या विषयावरील प्रशिक्षण कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी भारतीय लोकप्रशासन संस्था महाराष्ट्र प्रादेशिक शाखेचे अध्यक्ष स्वाधिन क्षत्रिय, मानद खजिनदार विकास देवधर आणि विशेष कार्य अधिकारी शशांक यशवंत बर्वे, यांची उपस्थित होते.

सुमनेश जोशी म्हणाले, कागदी फाईल्सऐवजी डिजिटल वर्कफ्लो, नोंदवहींऐवजी डॅशबोर्ड आणि विलंबाऐवजी रिअल-टाइम मॉनिटरिंगकडे प्रशासनाची वाटचाल झाली आहे.

डेटा संरचना, अचूक डेटा संकलन, पेपरलेस कामकाज आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) च्या वापरावर त्यांनी भर दिला. डिजिटल पब्लिक इन्फ्रास्ट्रक्चर (डीपीआय) ला डिजिटल महामार्गाची उपमा देत आधार आणि एमआधार ॲपद्वारे डेटा सुरक्षित ठेवण्याबाबत माहिती त्यांनी दिली. तसेच सायबर सुरक्षेसाठी 'संचार साथी' पोर्टल वापरण्याचे आवाहन केले.

प्रशिक्षणार्थी आणि शासकीय अधिकारी/ कर्मचारी यांना डिजिटल गव्हर्नन्स या विषयाबाबत भविष्यात काही नवीन प्रश्न, शंका, मुद्दे उपस्थित झाल्यास फोन करून ईमेल पाठवून केव्हाही विचारू शकता असे जोशी यांनी यावेळी सांगितले.

# 6 ठिकाणी सखोल स्वच्छता मोहीमांव्दारे 'हिंद-दी-चादर' अंतर्गत सेवाभावी उपक्रम

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी मुंबई** : 28 फेब्रुवारी व 1 मार्च रोजी खारघर येथे संपन्न होणा-या हिंद-दी-चादर कार्यक्रमाचा एक भाग म्हणून नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने स्वच्छता आणि आरोग्य यांचा परस्पर संबंध लक्षात घेत ठिकठिकाणी



सखोल स्वच्छता मोहीमा राबविण्यात येत आहेत.यानुसार आज घणसोली विभागामध्ये राजीव गांधी खदान तलाव गोठीवली परिसरात, तुर्भे विभागातील गणपतीपाडा परिसरात, सानपाडा सेक्टर 9 गुरुद्वारा परिसरामध्ये, ऐरोली गणपती कॉलनी व ऐरोली नाका परिसरात, वाशी सेक्टर 10 येथील गुरुद्वारा परिसरात, बेलापूर विभागात सायन बेलापूर हायवे अशा 6 ठिकाणी विशेष स्वच्छता मोहीमा राबविण्यात आल्या. यामध्ये स्वच्छता अधिकारी, स्वच्छता निरीक्षक व स्वच्छतामित्र, स्वच्छतासखी व नागरिकांसह 327 जण सहभागी होते.

त्याचप्रमाणे नमुंमपा शाळा क्र 42 घणसोली व गोडसन इंग्लिश स्कुल येथे स्वच्छतेच्या सात सवयींविषयी विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करण्यात आली.

# शंखनाद आणि मंत्रोच्चारात जेष्ठ समाजसेवक बबन चौबे यांचा अमृत महोत्सव

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** आपल्या कार्यशैली आणि कर्तृत्वाच्या बळावर सामाजिक जीवनात वेगळे स्थान निर्माण करणारे कल्याण येथील ज्येष्ठ समाजसेवक व समाज उद्धार समितीचे संचालक बबन रामनाथ चौबे यांचा ७५ वा वाढदिवस अमृत महोत्सव अत्यंत खास पद्धतीने साजरा करण्यात आला. पाश्चिमात्य संस्कृतीपासून दूर राहून सनातन धर्माच्या परंपरेनुसार बबन चौबे यांचा अमृतमहोत्सवी जन्मदिन साजरा करण्यात आला. कल्याण येथील




कशिश हॉटेलमध्ये आयोजित करण्यात आलेल्या या वाढदिवस सोहळ्यात शंखनाद आणि मंत्रोच्चार करण्यात आले. सनातन धर्मात शंखनादाला अत्यंत पवित्र मानले जाते. शंखनादामुळे वातावरण शुद्ध होते, अशी मान्यता आहे. याच कारणास्तव प्रत्येक शंखनादानंतर पंडितांकडून मंत्रोच्चार करण्यात आले. याप्रसंगी राजकीय, शैक्षणिक, सामाजिक तसेच आरोग्य क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून बबन चौबे यांना शुभेच्छा दिल्या. यामध्ये माजी मंत्री जगन्नाथ पाटील, भाजप आमदार सुलभा गायकवाड, राष्ट्रवादी (शरद पवार गट) जिल्हाध्यक्ष वंडार पाटील, शिवसेना नगरसेवक कुणाल पाटील, रमाकांत उपाध्याय, नगरसेवक नवीन गवळी, मोरेश्वर भोईर, २७ गाव हक्क संरक्षण संघर्ष समितीचे उपाध्यक्ष सत्यवान म्हात्रे, राजन दुबे, विजय पंडित, संजय मोरे, संजय शिर्के यांच्यासह अनेक प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते. तसेच बबन चौबे यांच्या कुटुंबीयांकडून प्रदीप चौबे, दीपक चौबे, डॉ. जे. पी. शुक्ला आणि मुख्याध्यापिका पुष्पा शुक्ला यांनी सर्व मान्यवरांचे स्वागत केले.

# बेलापूर टेकड्यांवरील अनधिकृत बांधकामांविरुद्ध पर्यावरणप्रेमींची मानवी साखळी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**प्रतिनिधी / दि. २१ नवी मुंबई :** निसर्गसंपन्नतेसाठी ओळखल्या जाणाऱ्या बेलापूरच्या टेकड्यांवर धार्मिक स्थळांच्या नावाखाली मोठ्या प्रमाणावर अनधिकृत बांधकामांचा विळखा पडला आहे. यामुळे पर्यावरणाची गंभीर हानी होत असून, भविष्यात बेलापूरचे रूपांतर हानिकारक मानवी वस्तीमध्ये होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

या गंभीर समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी आणि प्रशासनाला जागे करण्यासाठी 'सेव्ह बेलापूर हिल्स' संघटनेतर्फे रविवार, २२ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी महाकाली चौक, अभ्युदय बँक समोर भव्य 'मानवी साखळी' आंदोलनाचे आयोजन करण्यात आले आहे. संघटनेने नवी मुंबईतील पर्यावरणप्रेमी आणि सजग नागरिकांना या कार्यक्रमात सक्रिय सहभाग नोंदवण्याचे आवाहन केले आहे.

**कार्यक्रमाचा तपशील:**
**दिनांक: २२ फेब्रुवारी २०२६ (रविवार)**
**स्थळ: महाकाली चौक, अभ्युदय बँक समोर, बेलापूर**

बेलापूरमधील अनधिकृत अतिक्रमणांविरुद्ध पर्यावरण प्रेमींनी दीर्घकाळ लढा दिला असून, मानवी हक्क आयोगाने सिडको आणि नवी मुंबई महानगरपालिकेला बांधकामे हटवण्याचे आदेश दिले होते. मात्र प्रशासनाची उदासीनता पाहता, धार्मिक स्थळांच्या संख्येत मोठी वाढ झाली असून डोंगर पोखरल्यामुळे जमिनीची पकड सैल झाली आहे. भविष्यात दरड कोसळण्याची संभाव्यता आहे.

'सेव्ह बेलापूर हिल्स' संघटनेने स्पष्ट केले आहे की, हा लढा निसर्गासाठी आहे; धर्म किंवा श्रद्धा विरोधात नाही. अधिकृत भूखंड देऊन टेकड्यांवरील अनधिकृत अतिक्रमणे हटवावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

# जिल्हा परिषद शाळा राहनाळ येथे माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** १ मार्च १९२० रोजी स्थापन झालेल्या जिल्हा परिषद केंद्र शाळा राहनाळ येथे माजी विद्यार्थ्यांचा भव्य स्नेहमेळावा उत्साहात संपन्न झाला. तब्बल शतकाची परंपरा लाभलेल्या या शाळेत पुन्हा एकदा विद्यार्थ्यांची शाळा भरली, घंटा वाजली आणि पाहता पाहता वय वर्ष ८५ पासून ते १५ ते २० वर्षांपर्यंतचे माजी विद्यार्थी शाळेच्या प्रांगणात जमा झाले. प्रार्थना, राष्ट्रगीत, सुविचार आणि दिनविशेष यांचा आनंद घेत सर्वांनी आपल्या बालपणीच्या आठवणींना उजाळा दिला.या स्नेहमेळाव्याचे आयोजन विद्यार्थी सुरक्षा समिती व भौतिक विकास समितीचे अध्यक्ष प्रताप पाटील, माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष तुकाराम मढवी, महिला तक्रार निवारण समिती अध्यक्षा प्रियांका पाटील, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा रजनी नाईक आणि शाळेचे मुख्याध्यापक अजय पाटील यांच्या संकल्पनेतून करण्यात आले होते. या मेळाव्याला सुमारे ३०० हून अधिक माजी विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त उपस्थिती लावली. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून माजी सरपंच राजेंद्र मढवी तसेच ग्रामविकास अधिकारी गणेश पडवळ उपस्थित होते. आपापल्या क्षेत्रात यश संपादन केलेल्या अनेक माजी विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त करत शाळेप्रती कृतज्ञता व्यक्त केली. तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष तथा आगरी समाज उन्नती मंडळाचे अध्यक्ष नामदेव पाटील यांनी, "याच शाळेत मी कबड्डी शिकलो, दंगामस्ती केली; परंतु शिक्षकांच्या शिस्तीमुळेच आयुष्यात सुधारलो," असे सांगितले. माजी सरपंच अविनाश पाटील यांनी मित्र-मैत्रिणींच्या आठवणींना उजाळा दिला. रविकांत पाटील यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले, "राहनाळ शाळेने मला खूप काही दिले आहे. त्या काळातील शिक्षकांची शिस्त आजही आठवते." मनोहर पाटील यांनीही आपल्या शालेय जीवनातील आठवणींना उजाळा देत शाळेबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. मुख्याध्यापक अजय पाटील यांनी स्थानिक पालकांना आपल्या मुलांचा प्रवेश राहनाळ शाळेत घेण्याचे आवाहन करत, "स्वावलंबन, शिस्त आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी ही शाळा कटिबद्ध आहे," असे सांगितले. कार्यक्रमादरम्यान माजी विद्यार्थ्यांचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. माजी प्रभारी सरपंच शिवनाथ भोईर यांनी कविता सादर करून कार्यक्रमात रंग भरले. ॲड. सचिन भोईर यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

# १३४ औद्योगिक भूखंडांवरील उद्योग बंद

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) मार्फत उद्योजकांना औद्योगिक विकासाच्या उद्देशाने विकसित भूखंडांचे वाटप करण्यात येते. सदर भूखंड धारकांनी करारातील अटी व शर्तीप्रमाणे विहित कालावधीत आवश्यक परवानग्या प्राप्त करून उद्योग सुरू करणे व प्रत्यक्ष उत्पादनात जाणे बंधनकारक असते.

या अनुषंगाने, प्रादेशिक कार्यालय, ठाणे–२ यांच्या पथकाकडून अंबरनाथ, कल्याण, भिवंडी व मुरबाड तालुक्यांतील अंतर्गत औद्योगिक क्षेत्रामध्ये पाहणी व सर्वेक्षण करण्यात आले. या पाहणीअंती एकूण १३४ भूखंडांवरील उद्योग बंद स्थितीत असल्याचे निदर्शनास आले आहे. संबंधित भूखंड धारकांनी अद्यापपर्यंत आवश्यक शासकीय परवानग्या प्राप्त करून उद्योग सुरू केलेला नाही किंवा उत्पादन प्रक्रिया सुरू केलेली नाही, असे आढळून आले आहे.करारनामा व लागू नियमांनुसार भूखंडाचा उद्देशपूर्ण वापर न केल्यास किंवा निर्धारित मुदतीत उत्पादन सुरू न केल्यास संबंधित भूखंड ताब्यात घेण्याची तरतूद आहे. त्यानुसार, संबंधित भूखंड धारकांना कारणे दाखवा नोटिसा बजाविण्याची कार्यवाही हाती घेण्यात येत आहे. विहित कालावधीत समाधानकारक खुलासा न मिळाल्यास किंवा उद्योग प्रत्यक्ष सुरू न झाल्यास, संबंधित भूखंड महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ ताब्यात घेणार आहे.त्यानंतर नियमावलीनुसार व पारदर्शक पद्धतीने सदर भूखंड गरजू व पात्र उद्योजकांना महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने विकसित केलेल्या मिलाप पोर्टल वरून ऑनलाइन पद्धतीने पुनर्वाटप करण्यात येणार आहे. या प्रक्रियेमुळे औद्योगिक क्षेत्रातील निष्क्रिय भूखंडांचा प्रभावी वापर होऊन स्थानिक पातळीवर रोजगारनिर्मिती व औद्योगिक विकासास चालना मिळण्यास मदत होईल, अशी माहिती प्रादेशिक कार्यालय, ठाणे–२ यांच्याकडून देण्यात आली आहे.




Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024